**श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि.,तात्यासाहेब कोरेनगर.**
**पोस्ट वारणानगर, जिल्हा कोल्हापूर.**
**वार्षिक साधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांकरिता)**

आपल्या संघाची सन **२०२३-२०२४** (दि.०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४) या वर्षाची **५६ वी वार्षिक साधारण सभा गुरूवार दि.२६/०९/२०२४** रोजी **दुपारी १.०० वाजता 'तात्यासाहेब कोरेनगर'** येथे संघाचे कार्यस्थळावर बोलाविणेत आलेली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी व सभासद संस्थेच्या प्रतिनिधींनी हजर रहावे ही नम्र विनंती.

**सभेपुढे येणारे विषय**

१. दि. २७/०९/२०२३ च्या वार्षिक साधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१/०३/२०२४ इसवी अखेर संपलेल्या वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल स्वीकारणे व त्याची नोंद घेणे.
३. दिनांक ३१ मार्च २०२४ अखेरच्या हिशोबाचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रक दाखल करुन घेणे व मंजूर करणे.
४. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये झालेल्या भांडवली खर्चास मंजूरी देणे.
५. सन २०२४-२५ वर्षाकरिता मा.संचालक मंडळाच्यावतीने सादर केलेल्या अंदाजपत्रकाची व भांडवल उभारणीसाठी सुचविलेल्या योजनांची नोंद घेणे आणि सन २०२३-२४ वर्षामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
६. सन २०२३-२०२४ या वर्षातील नफा विभागणीबाबत संचालक मंडळाने सादर केलेल्या ठरावास मान्यता देणे.
७. मा. लेखापरीक्षक यांचा दि. ३१ मार्च २०२४ अखेर हिशोब तपासणीचा अहवाल अवलोकून त्यानुसार मा. संचालक मंडळाने सादर केलेला दोष दुरुस्ती अहवाल स्वीकारणे.
८. सन २०२४-२५ वर्षाकरीता लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
९. संघाच्या सहाय्यकारी संस्थांचे ताळेबंद व नफा तोटा पत्रकांचे वाचन करणे.
१०. मल्टीस्टेट को-ऑप.सोसायटीज ॲक्ट २००२ व दुरूस्त कायदा २०२३ नूसार तसेच मा.केंद्रीय निबंधक सहकार,नवी दिल्ली यांचेकडील दि.१६/१०/२०२३ च्या प्राप्त नमुना(Sample) पोटनियमातील निर्देशानुसार संघाचे पोटनियमात दुरुस्ती करण्याबाबतचे प्रस्तावावर विचार करणे.
११. मा.संचालक मंडळ सदस्य अथवा त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे व त्यांनी केलेली परतफेड आणि येणे रक्कमेचा आढावा घेणे.
१२. मा.संचालक मंडळ सदस्य व कार्यकारी संचालक यांचे संघाचे सेवेत असलेल्या नातेवाईकांच्या यादीची नोंद घेणे.
१३. संघाच्या व्यक्ती व संस्था सभासदांना सन २०२३-२०२४ या वर्षात सवलतीच्या दराने दिलेल्या तूप,श्रीखंड इत्यादी दुग्धपदार्थाची नोंद घेणे.
१४. मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांचा विचार करणे.

जा.नं.वादुउ/आस्थापना/८१७/२४-२५
तात्यासाहेब कोरेनगर, दिनांक : ०६/०९/२०२४

मा.संचालक मंडळाचे आदेशावरुन
**मोहन चिदंबर येडूरकर**
कार्यकारी संचालक

---

टीप :- १) सभासद संस्थेतर्फे वार्षिक साधारण सभेस हजर राहणा-यां प्रतिनिधींनी पंच कमिटीच्या ठरावाच्या सही शिक्क्याच्या नकला बरोबर आणाव्यात २)आयत्यावेळी विचार करावयाचे विषय धोरणात्मक व योजनात्मक असावेत व ते दिनांक २२/०९/२०२४ पूर्वी मे. संचालक मंडळाचे विचारासाठी पाठवावेत. त्यानंतर आलेल्या विषयांचा विचार केला जाणार नाही.
३) बहुराज्यीय सहकार कायदा आणि पोटनियमातील तरतूदीनुसार कोरम नसेल तर अशा वेळी सभा एक तास पुढे ढकलली जाईल व त्यानंतर ती त्याच ठिकाणी घेतली जाईल.
४) विषय क्र.१० स अनुसरून पोटनियम दुरूस्त मसुदा संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळेल तसेच संघाच्या मुख्य कार्यालय व शाखांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आला आहे.